महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ २१ जून २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३५३ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# मुंबईत ‘सहकार से समृद्धी’ परिसंवाद

## ग्रामीण भागात परिवर्तन घडवण्यासाठी केंद्र सरकार कटिबद्ध-अमित शहा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

सहकाराच्या माध्यमातून महिला आणि तरुणांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत असून, “सहकार से समृद्धी” या आधारावर ग्रामीण भागात परिवर्तन घडवण्यासाठी केंद्र सरकार कटिबद्ध असल्याचे मत केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमितभाई शाह यांनी आज मुंबईत ‘सहकार से समृद्धि’ या विशेष राष्ट्रीय परिसंवादात बोलताना व्यक्त केले.




अमित शाह यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या परिसंवादात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील उपस्थित होते. यावेळी सहकार क्षेत्रातील ’नाफेडचे योगदान आणि सहकार चळवळीचे महत्त्व’ या विषयावर आधारित लघुपटाचे सादरीकरण करण्यात आले. तसेच पाच पॅक्स संस्थांना ’नाफेड बाजार’ फ्रँचायझी सुरू करण्यासाठी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच ५ एफपीओंना इक्विटी अनुदानाचा धनादेश देण्यात आला.

भारतासाठी, सहकार हे पारंपारिक जीवनशैलीत रुजलेले तत्वज्ञान आहे. एकत्र येणे, विचार करणे, काम करणे, समान ध्येयाकडे पुढे जाणे, आनंदात आणि दुःखात एकमेकांच्या पाठीशी उभे राहणे, हा भारतीय जीवनशैलीच्या तत्वज्ञानाचा आत्मा आहे. देशात २ लाख नवीन प्राथमिक कृषी पतसंस्था (PACS) स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे, असे याप्रसंगी बोलताना अमितभाई शाह यांनी सांगितले. देशातील पॅक्स संस्थांना केवळ कृषीपुरते मर्यादित न ठेवता, २२ नव्या सेवा क्षेत्रांशी जोडण्यात येत आहे. यामध्ये जनऔषधी केंद्रे, गॅस वितरण, पेट्रोल पंप, रेल्वे तिकीट सेवा, टॅक्सी सेवा अशा सेवा क्षेत्रांचा समावेश असेल. विशेष म्हणजे, “नॅशनल टॅक्सी” या आगामी सहकारी उपक्रमात टॅक्सी चालक हेच वाहनाचे मालक असतील आणि नफा थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होईल, असेही त्यांनी याप्रसंगी स्पष्ट केले.

यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषिमंत्री अ‍ॅड.माणिकराव कोकाटे, माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, सहकार राज्यमंत्री पंकज भोयर, नाफेडचे अध्यक्ष जेठाभाई अहिर, महाव्यवस्थापक अमित गोयल, व्यवस्थापकीय संचालक दीपक अग्रवाल तसेच संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

थोडक्यात महत्वाचे

# विद्युत यंत्रणा कोलमडल्याने पश्चिम रेल्वे ठप्प



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर :** पश्चिम रेल्वेच्या पालघर रेल्वे स्थानका नजीक ओव्हरहेड वायर तुटल्याने पश्चिम रेल्वेचा खोळंबा झाला ऐन कामावर सुटण्याच्या वेळेतच ओव्हरहेड वायर तुटल्यामुळे पालघर रेल्वे स्थानकात प्रवाशांची प्रचंड गर्दी जमली. बांद्रा अजमेर एक्सप्रेस पालघर रेल्वे स्थानकाच्या क्रॉसिंग वरून जात असताना तिच्या पॅन्टग्राफ मध्ये ओव्हर हेड वायर अडकली व त्यानंतर गुजरातकडे जाणाऱ्या दोन्ही लाईनच्या ओव्हरहेड वायर नुकसानग्रस्त झाल्या.

ही गाडी पालघर रेल्वे स्थानकाच्या पुढे क्रॉसिंग वर थांबवण्यात आली. ओव्हरहेड वायर तुटल्यामुळे लांब पल्ल्यांच्या रेल्वे गाड्या सह विरार डहाणू लोकल सेवा पूर्णपणे ठप्प झाली आहे. बांद्रा अजमेर एक्सप्रेस पालघर येथे उभी केल्याने तिच्या मागून येणाऱ्या सर्व गाड्या केळवे, सफाळे, विरार येथे थांबवण्यात आल्या आहेत. तर गुजरात कडून किंवा डहाणू कडून येणाऱ्या सर्व गाड्या डहाणू ते बोईसर दरम्यान थांबवण्यात आल्या.

मुंबईकडून गुजरात कडे जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या गाड्या तसेच उपनगरीय सेवा पालघर च्या अलीकडच्या स्थानकांमध्ये थांबून ठेवले असून या दुरुस्तीसाठी काही तासांचा अवधी लागेल अशी शक्यता आहे.

हा तांत्रिक बिघाड सायंकाळी साडेसहा ६.४५ च्या सुमारास झाल्याचे परिसरातील नागरिकांकडून सांगण्यात आले. या घटनेनंतर रेल्वेने सायरन वाजवून सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना सतर्कता केले. मात्र यामुळे नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण पसरले होते.

# राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक रुग्णालयात



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** महाराष्ट्राचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना ताप आला आणि अंगदुखीचा त्रास वाढला. यामुळे त्यांना ज्युपिटर रुग्णालयात दाखल करण्यात आले. आजारी असल्यामुळे प्रताप सरनाईक यांच्यावर बुधवारपासूनच उपचार सुरू आहेत. डॉक्टरांनी प्रताप सरनाईक यांना काही दिवस विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे धाराशिवचे पालकमंत्री आणि शिवसेनेचे पालघर जिल्हा संपर्कमंत्री म्हणून कार्यरत आहेत. तब्येत बिघडल्यामुळे बुधवारपासून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. तापामुळे प्रताप सरनाईक यांना अशक्तपणा जाणवत आहे. पण त्यांच्या कोरोना, डेंग्यू आणि टायफॉइडच्या आतापर्यंत केलेल्या चाचण्या नकारात्मक आल्या. सरनाईक यांना कोरोना, डेंग्यू, टायफॉइड झालेला नाही, असे चाचणीचे अहवाल बघून डॉक्टरांकडून सांगण्यात आले. उपचार सुरू आहेत आणि प्रताप सरनाईक विश्रांती घेत आहेत. लवकरच त्यांच्या तब्येतीला आराम पडेल, असे डॉक्टरांनी सांगितले.

# क्रीडा क्षेत्रात शहराचा नावलौकिक वाढवण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार - आयुक्त अनमोल सागर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी:दि.20** जून क्रीडा हे मनोरंजनासाठी नव्हे तर व्यावसायिक ध्येय ठेवून प्रगती केल्यास क्रीडा क्षेत्रात वेगवेगळ्या संधी मिळू शकतात,भिवंडी शहराची ओळख क्रीडा क्षेत्रामुळे होण्यासाठी शहरातून चांगले खेळाडू पुढे येणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्वतोपरी सहकार्य पालिका करण्यास तयार आहे असे प्रतिपादन आयुक्त अनमोल सागर यांनी केले.ते महानगरपालिकेवतीने जिल्हा राज्य व राष्ट्रीय क्रीडा प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंसाठी आयोजित प्रशिक्षण शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलत होते.याप्रसंगी मार्गदर्शक



आहार तज्ञ डॉ. धनंजय मोरे,क्रीडा मानसोपचार तज्ञ डॉ. राधिका धारप,क्रीडा फिजियोथेरिपिस्ट डॉ. शरयू एस,राष्ट्रीय अ‍ॅथलेटिक्स संघटनेचे प्रशिक्षक सुशील इनामदार यांनी मार्गदर्शक केले.दिवसभर सुरू राहणाऱ्या या शिबिरातील पहिल्या सत्राचा शुभारंभ शहर अभियंता जमील पटेल यांच्या शुभहस्ते पार पडले.या शिबिरास शहरातील विविध शाळांमधील जिल्हा व राज्य, राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळविलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दाखवली होती.कार्यक्रमाच्या सुरवातीला विद्यार्थ्यांनी योगा प्रात्यक्षिक करून दाखविले.तर आयुक्त अनमोल सागर यांच्या शुभहस्ते राज्य व राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त खेळाडूंचा गौरव करण्यात आला.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्रीडा विभाग प्रमुख मिलिंद पळसुले व क्रीडा अधिकारी शरद कलावंत यांनी विशेष मेहनत घेतली.



# पावसाळी पर्यटनावर वनविभागाची टाच

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** पावसाळा सुरू होताच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील येऊर परिसर हिरवाईने नटलेल्या जंगलातील सौंदर्य पर्यटकांना खुणावत. अनेक जण येथे भटकंती, फोटोग्राफी, व्हिडीओ शूटिंग, ‘ट्रेकिंग’ किंवा ‘रिल्स’ बनवण्यासाठी गर्दी करू लागतात. विशेषतः पावसामुळे जिवंत झालेल्या झऱ्यांमुळे निर्माण होणारे धबधबे हे नेहमीच आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरतात्र याच धबधब्यांचा आनंद काही वेळा जीवघेणा ठरू शकतो याच पार्श्वभूमीवर वन विभागाने अशा जागेत जाण्यासाठी प्रतिबंध केला आहे. मागील काही वर्षांत धबधब्याजवळ घडलेल्या अपघाती घटनांमध्ये काही तरुणांचे बळी गेले आहेत.

अचानक वाढलेला पाण्याचा प्रवाह, निसरडी दगडमाती, अंदाज न येणारे खोलगट भाग, आणि सेल्फी घेण्याच्या नादात मृत्यूच्या दाढेत ओढले आहे. या साऱ्यामुळे ही ठिकाणं धोकादायक ठरत आहेत. ही पार्श्वभूमी लक्षात घेता, ठाणे वन विभाग, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान प्रशासन आणि स्थानिक सुरक्षा यंत्रणांनी पावसाळी पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने

### राष्ट्रीय उद्यान परिसरात बंदी; धबधब्यांवर गेल्यास होणार कठोर कारवाई

कठोर पावले उचलली आहेत.

**अनधिकृत प्रवेशमार्गांवर विशेष लक्ष**

धबधब्याजवळ जाणे, उशिरा पर्यंत थांबणे, मद्यप्राशन करून जंगल परिसरात फिरणे किंवा मोबाईलवर व्हिडीओ शूटिंग करण्यासाठी अतिक्रमण करणे, या साऱ्यांवर आता बारीक लक्ष ठेवण्यात येणार आहे. नियमभंग करणाऱ्यांवर भारतीय वन अधिनियम अंतर्गत दंडात्मक कारवाई केली जाईल.

**वन विभागाने सीसीटीव्ही कॅमेरे, जंगलात गस्त घालणारे पथक, तसेच स्थानिक पोलीस यांच्या सहकार्याने योजना आखली आहे. जंगलात कोणतेही अनधिकृत प्रवेशमार्ग वापरले जात असल्यास त्यांच्यावर विशेष लक्ष देण्यात येणार आहे.**

**- मयुर सुरवसे (वनपरिक्षेत्र अधिकारी येऊर)**

# तिसऱ्या भाषेच्या तिढ्यावर शिक्षण विभागाचा तोडगा

## तिसरी भाषा निवडलेल्या विद्यार्थ्यांना बालभारती व्हिडिओच्या माध्यमातून ऑनलाइन धडे ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्यात हिंदी भाषेच्या सक्तीवरुन राजकारण पेटलं असताना सरकारने तिसऱ्या भाषेच्या शिक्षकांबाबत मोठा निर्णय घेतला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील त्रिभाषा सूत्रानुसार इयत्ता पहिलीपासून विद्यार्थ्यांना मराठी, इंग्रजीनंतर एका तिसऱ्या भाषेतून शिक्षण घेण्याचे बंधन घातले आहे. तिसरी भाषा म्हणून हिंदीची सक्ती करण्यात आली होती, या सक्तीचा निर्णय रद्द केला आहे. पण तिसरी भाषा म्हणून हिंदी, तेलुगु, कन्नड, गुजराती आदी भाषेसाठी शिक्षक कुठून आणणार असा प्रश्न शाळा प्रशासनासमोर आहे. यावर सरकारने तोडगा काढला आहे.



आधीच शिक्षकांची कमरता आहे, यात तिसऱ्या भाषेसाठी शिक्षक कसा नेमायचा असा प्रश्न निर्माण झाला आहे. 20 पेक्षा कमी विद्यार्थी असलेल्या भाषेचे शिक्षण विद्यार्थ्यांना बालभारती व्हिडिओच्या माध्यमातून ऑनलाइन देणार आहे. तिसरी भाषा निवडलेल्या विद्यार्थ्यांची संख्या जर 20 पेक्षा जास्त असल्यास त्यासाठी त्या विषयाचा शिक्षक शालेय शिक्षण विभागाकडे उपलब्ध आहे का? याची माहिती घेतली जाणार आहे.

जर त्या विषयाचे शिक्षक विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी उपलब्ध नसल्यास कंत्राटी तत्त्वावर त्या विषयाच्या (माध्यम) शिक्षकांची नेमणूक करावी लागणार असून, तशी तयारी शिक्षण विभागाची आहे. हिंदीशिवाय अन्य तिसऱ्या भाषांचे शिक्षक उपलब्ध नसल्यात अशा विषयाच्या शिक्षकांची कंत्राटी पद्धतीने भरती करण्यात येणार आहे. याबाबत आज शिक्षण विभागाची महत्वाची बैठक होणार आहे.

सध्या तमीळ, तेलुगु, उर्दू, कन्नड माध्यमातून डी.एड.- बी.एड. झालेल्या शिक्षकांची संख्या अत्यल्प आहे. ही कमरता भरुन काढण्यासाठी कंत्राटी पद्धतीने शिक्षक भरती करणार असल्याची माहिती आहे. शाळा सुरु होऊन चार दिवस झाले असून बहुसंख्य विद्यार्थ्यांनी तिसरा विषय निवडलेला नाही, तिसऱ्या भाषेची पुस्तके उपलब्ध नाहीत, त्यामुळे तिसरा विषय विद्यार्थी कसे शिकणार हा प्रश्न अद्याप सुटलेला नाही.












# आंतरराष्ट्रीय योग दिन

या वर्षी ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन "एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग" या संकल्पनेसह साजरा केला जात आहे, जो वैयक्तिक आरोग्य आणि ग्रहांचे आरोग्य अविभाज्यपणे जोडलेले आहेत या महत्त्वाच्या सत्याचे प्रतिध्वनी करतो. योग शरीराला बळकटी देतो, मन शांत करतो आणि दैनंदिन जीवनात जागरूकता आणि जबाबदारीची भावना वाढवतो. ही जागरूकता एखाद्याला निरोगी आणि अधिक शाश्वत जीवनशैली निवडण्याची परवानगी देते. स्वतःची काळजी घेताना, आपण पृथ्वीची काळजी घेण्यास सुरुवात करतो, वसुधैव कुटुंबकम - जग एक कुटुंब आहे या चिरस्थायी भारतीय नीतिमत्तेचे प्रतिबिंब.

**योग म्हणजे काय आणि आपण तो का साजरा करतो?**

योग ही एक प्राचीन शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक पद्धत आहे जी भारतात उगम पावली. 'योग' हा शब्द संस्कृतमधून आला आहे आणि त्याचा अर्थ जोडणे किंवा एकत्र येणे असा होतो, जो शरीर आणि चेतनेच्या मिलनाचे प्रतीक आहे.

आज जगभरात ते विविध स्वरूपात पाळले जाते आणि त्याची लोकप्रियता वाढतच आहे.

११ डिसेंबर २०१४ रोजी, संयुक्त राष्ट्रांनी ठराव ६९/१३१ द्वारे २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला . आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्याचे उद्दिष्ट जगभरात योगाभ्यासाच्या अनेक फायद्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे आहे. आंतरराष्ट्रीय योग दिन स्थापन करण्याचा मसुदा ठराव भारताने मांडला होता आणि त्याला विक्रमी १७५ सदस्य राष्ट्रांनी मान्यता दिली होती. हा प्रस्ताव सर्वप्रथम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ६९ व्या महासभेच्या उद्घाटनप्रसंगी आपल्या भाषणात मांडला होता, ज्यामध्ये ते म्हणाले होते: "योग ही आपल्या प्राचीन परंपरेची एक अमूल्य देणगी आहे. योग मन आणि शरीर, विचार आणि कृती यांच्या एकतेचे प्रतीक आहे... एक समग्र दृष्टिकोन [जो] आपल्या आरोग्यासाठी आणि आपल्या कल्याणासाठी मौल्यवान आहे. योग केवळ व्यायामाबद्दल नाही; तो स्वतःशी, जगाशी आणि निसर्गाशी एकतेची भावना शोधण्याचा एक मार्ग आहे."

या ठरावात "व्यक्ती आणि लोकसंख्येने निरोगी निवडी करणे आणि चांगल्या आरोग्याला चालना देणाऱ्या जीवनशैलीच्या पद्धतींचे पालन करणे" हे महत्त्वाचे नमूद केले आहे. या संदर्भात, जागतिक आरोग्य संघटनेने त्यांच्या सदस्य राष्ट्रांना त्यांच्या नागरिकांना शारीरिक निष्क्रियता कमी करण्यास मदत करण्याचे आवाहन केले आहे, जे जगभरातील मृत्यूच्या दहा प्रमुख कारणांपैकी एक आहे आणि हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग, कर्करोग आणि मधुमेह यांसारख्या असंसर्गजन्य रोगांसाठी एक प्रमुख जोखीम घटक आहे.

पण योग हा केवळ शारीरिक हालचालींपेक्षा जास्त आहे. त्याच्या सर्वात प्रसिद्ध अभ्यासकांपैकी एक, दिवंगत बीकेएस अय्यंगार यांच्या शब्दांत, "योग दैनंदिन जीवनात संतुलित दृष्टिकोन राखण्याचे मार्ग विकसित करतो आणि एखाद्याच्या कृती करण्याच्या कौशल्याला बहाल करतो."

योग, एक परिवर्तनकारी सराव, मन आणि शरीराच्या सुसंवादाचे, विचार आणि कृतीमधील संतुलनाचे आणि संयम आणि पूर्णतेचे एकतेचे प्रतिनिधित्व करतो. ते शरीर, मन, आत्मा आणि आत्मा यांना एकत्रित करते, आरोग्य आणि कल्याणासाठी एक समग्र दृष्टिकोन देते जे आपल्या धावपळीच्या जीवनात शांती आणते. परिवर्तन करण्याची त्याची शक्ती हीच आपण या विशेष दिवशी साजरी करतो.

११ डिसेंबर २०१४ रोजी, संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला. तेव्हापासून, जगभरातील लाखो लोक, योगाच्या सरावाने एकत्रित होऊन, दरवर्षी हा दिवस साजरा करतात. हा जागतिक उत्सव एकता आणि सुसंवाद वाढवतो, सीमा आणि संस्कृती ओलांडतो आणि आपल्याला शांती आणि कल्याणाच्या जगाच्या जवळ आणतो. २०२३ मध्ये, संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात झालेल्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या उत्सवाने बहुतेक राष्ट्रीयत्वांच्या योग उत्साही लोकांच्या सहभागासाठी गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड तयार केला.

या वर्षी ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन आहे, जो सर्वांच्या सहभागाचे स्वागत करतो आणि त्याचे कौतुक करतो. संयुक्त राष्ट्रांमधील भारताच्या स्थायी मिशनने आयोजित केलेला हा कार्यक्रम UNHQ च्या नॉर्थ लॉन एरियामध्ये "एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग" या थीमसह होणार आहे. उपस्थितांमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य राष्ट्रांचे प्रतिनिधी, संयुक्त राष्ट्रांचे अधिकारी आणि कर्मचारी आणि न्यू यॉर्कमधील विविध क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्तींचा समावेश असेल. योगाचे कल्याणावर भर देणाऱ्या आणि जागतिक आरोग्य आणि शांतीला प्रोत्साहन देणाऱ्या व्यापक चळवळीत रूपांतर करणे हे उद्दिष्ट आहे.

## गीतासार



### अध्याय १४
### गुणत्रयविभागयोगः

तत्र सत्त्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनामयम्
। सुखसङ्गेन बध्नाति ज्ञानसङ्गेन चानघ
॥ १४-६ ॥

हे निष्पाप अर्जुना, त्या तीन गुणांमधील सत्त्वगुण निर्मळ असल्यामुळे प्रकाश उत्पन्न करणारा आणि विकाररहित आहे. तो सुखासंबंधीच्या आणि ज्ञानासंबंधीच्या अभिमानाने बांधतो. ॥ १४-६ ॥

रजो रागात्मकं विद्धि तृष्णासङ्गसमुद्भवम्
। तन्निबध्नाति कौन्तेय कर्मसङ्गेन देहिनम्
॥ १४-७ ॥

हे कौंतेया (अर्थात कुंतीपुत्र अर्जुना), रागरूप रजोगुण इच्छा आणि आसक्ती यांपासून उत्पन्न झालेला आहे, असे समज. तो या जीवात्म्याला कर्मांच्या आणि त्यांच्या फळांच्या संबंधाने बांधतो. ॥ १४-७ ॥

तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनाम्
। प्रमादालस्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत
॥ १४-८ ॥

हे भारता (अर्थात भरतवंशी अर्जुना), सर्व देहाभिमानी पुरुषांना मोह पाडणारा तमोगुण अज्ञानापासून उत्पन्न झालेला आहे, असे समज. तो या जीवात्म्याला प्रमाद, आळस आणि निद्रा यांनी बांधतो. ॥ १४-८ ॥

## जिल्हा प्रमुख अरविंद मोरे यांच्या उपस्थितीत
# शिंदे सेनेच्या मुरबाड तालुका नियुक्त्या जाहीर



## शिवसैनिकामध्ये संचारले नवचैतन्य!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : राज्यात शिवसेना नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशावरून, खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाने, नेते प्रकाश पाटील, उपनेते रुपेश म्हात्रे , निलेश सांबरे, संपर्कप्रमुख भिवंडी लोकसभा मदनबुवा नाईक, यांच्या सूचने नुसार अरविंद मोरे जिल्हाप्रमुख - कल्याण-मुरबाड यांनी मुरबाड तालुक्यातील पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन नवीन पदाधिकारी यांच्या नियुक्त्या जाहीर केले आहेत. यामध्ये ज्येष्ठ कार्यकर्ते विलास देशमुख यांची उप जिल्हाप्रमुख पदी,तर संतोष जाधव यांची संपर्क प्रमुख मुरबाड शहर व मुरबाड तालुका अलका पारधी मुरबाड तालुका संघटक,भरत गायकर विधानसभा क्षेत्र संघटक,नरेंद्र भाऊ यशवंतराव सरचिटणीस मुरबाड तालुका, युसूफ शेख अध्यक्ष अल्पसंख्याक विभाग मुरबाड तालुका,संदिप बबलू बहाडकर मुरबाड शहर संघटक, विनायक ढमणे समन्वयक मुरबाड तालुका, मिलिंद घरत सचिव मुरबाड तालुका, रमेश घोलप उप तालुकाप्रमुख अशोक मांडे उप तालुकाप्रमुख शरद गायकर विभागप्रमुख, द्वारकानाथ चौधरी विभागप्रमुख, शनिवा-र्या खोडका विभागप्रमुख, भरत गायकवाड उप विभागप्रमुख,संजय भानुशाली उप जिल्हाप्रमुख, मुरबाड तालुका प्रमुख कांतीलाल कंटे ,भारत (अप्पा) यशवंतराव,मुरबाड विधानसभा समन्वयक,कल्पेश धुमाळ मुरबाड विधानसभा संपर्क प्रमुख, देवयानी दळवी महिला आघाडी तालुकाप्रमुख मुरबाड,, अशा पद्धतीने पदाधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्यामुळे मुरबाड तालुक्यातील शिंदेसेनेत नव चैतन्य, निर्माण झाले आहे. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकानच्या पार्श्वभूमीवर ह्या नेमणुका केल्याने मुरबाड तालुक्यातील शिवसैनिकांमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

## योग दिनानिमित्त ठाणे जिल्ह्यात
# व्यापक स्तरावर योग सत्रांचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन दि. २१ जून, २०२५ रोजी देशभरात साजरा होत असून, यानिमित्त जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत आरोग्य विभागामार्फत संपूर्ण जिल्ह्यातील ग्रामपंचायती, शाळा, आरोग्य संस्था आणि सार्वजनिक ठिकाणी विशेष योग सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.

ठाणे जिल्ह्यातील नागरिकांनी, कर्मचारीवर्गाने, विद्यार्थी आणि स्वयंसेवी संस्थांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांचे आवाहन

**योग दिनाचे प्रमुख वैशिष्ट्ये:**

- २१ जून, २०२५ रोजी सकाळी ६:३० ते ७:४५ या वेळेत "योग संगम" या राष्ट्रीय कार्यक्रमाच्या अनुषंगाने योग सत्रांचे आयोजन.
- कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण विशाखापट्टणम, आंध्र प्रदेश येथून मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणार.
- प्रत्येक सहभागी संस्थेने https://yoga.ayush.gov.in/yoga-sangam या पोर्टलवर नोंदणी करून सहभाग प्रमाणपत्र प्राप्त करावे.
- जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) – टप्पा २ अंतर्गत विविध स्वच्छता, वृक्षारोपण आणि पर्यावरणीय उपक्रम योग दिनासोबत राबवले जाणार.
- 'Yoga for One Earth One Health / एक पृथ्वी एक आरोग्यासाठी योग' या संकल्पनेवर साजरा करण्यात येणार आहे.

**हरित उपक्रमांची जोड:**

योग सत्रांसोबतच प्रत्येक ठिकाणी "हरित योग" संकल्पनेतून वृक्षारोपण, परिसर स्वच्छता, आरोग्य जनजागृती व शाश्वत विकासाचे उपक्रम राबवले जाणार आहेत. यामध्ये ग्राम आरोग्य पोषण व स्वच्छता समित्या, आयुष केंद्रे, शाळा व युवक मंडळे सहभागी होतील.

"योग ही जीवनशैली आहे. ती केवळ आरोग्यासाठीच नव्हे, तर मन, शरीर व समाज यांच्यातील समतोल साधणारी शास्त्रशुद्ध प्रक्रिया आहे. ठाणे जिल्ह्यातील अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, खाजगी दवाखाने येथे प्रत्येक नागरिकाने या राष्ट्रीय अभियानात सक्रीय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी दिली आहे.

## दिव्यांग सशक्तीकरणासाठी
# राष्ट्रीय पुरस्काराकरिता अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय अंतर्गत दिव्यांगजन सशक्तीकरण विभागाच्या दिव्यांग व्यक्तींकरिता राष्ट्रीय पुरस्कार सन 2025 करिता नामांकन व अर्ज गृहकामकाज मंत्रालयाच्या केंद्रीकृत पोर्टलवर (www.awards.gov.in) केवळ ऑनलाईन पध्दतीने दि.15 जुलै 2025 पर्यंत मागविण्यात येत आहे.

तरी जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्ती व संस्था उक्त दिव्यांग सशक्तीकरणासाठी राष्ट्रीय पुरस्कार 2025 च्या अनुषंगाने दि.15 जुलै 2025 पर्यंत जास्तीत जास्त अर्ज सादर करुन योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा समाज विकास अधिकारी श्रीमती उज्वला सपकाळे यांनी केले आहे.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज/नामांकन मागविण्याच्या दृष्टीने दि.15 जुलै 2025 पर्यंत संकेतस्थळ उघडले असून त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

अर्ज/नामांकन (www.awards.gov.in) या संकेतस्थळावरुन भरण्यात यावी. राष्ट्रीय पुरस्कार 2025 करिता अर्ज/नामांकने सादर करण्याच्या दृष्टीने दि.15 जुलै 2025 या कालावधीकरिता संकेतस्थळ सुरु राहील. राष्ट्रीय पुरस्कार 2025 करिता अर्ज/नामांकने केवळ गृहमंत्रालयाने तयार केलेल्या (www.awards.gov.in) या ऑनलाईन पोर्टलवर पासवर्ड संरक्षित करुन सादर करावा.

पोर्टलवर उपलब्ध असलेल्या विशिष्ट नमुन्यातील अर्जामधील सर्व मुदयांची माहिती उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्याच्या सविस्तर वर्णनासह भरावी. समक्ष अथवा पोस्टाव्दारे सादर केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. पात्रता निकष व इतर सविस्तर तपशिल नमूद विभागाच्या (www.depwd.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणाच्या अनुषंगाने राष्ट्रीय पुरस्कारांसाठींच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विचारात घेण्यात येतील.

# कल्याण पूर्वेतील नाल्यावरील पुलाच्या रस्त्याचा भाग खचला

## सुरक्षेसाठी रस्ता वाहतूकीसाठी बंद



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पूर्वेतील आय प्रभागातील खडेगोळवली कडे जाणाऱ्या रस्त्यावरील मुख्य नाल्यावरील पुलाच्या रस्त्यावरील भाग खचल्याची घटना घडली. या घटनेत सुदैवाने जिवितहानी टळली. खडगोलवली कडे जाणर्या जिरेटोप चौक परिसरातील गॅस कंपनी परिसरातील रस्त्यावर असणाऱ्या मुख्य नाल्यावरील पुलाच्या रस्त्यावरील भाग सुरू असलेल्या पावसात खचल्याने निर्दशानास आले असून सुदैवाने जिवितहानी टळली. नाल्यावरील पुलावरील रस्त्याच्या भाग खचतो म्हणजे कामाचा दर्जा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेची गंर्भीयाने दखल घेत सहाय्यक आयुक्त उमेश यमगर यांनी वाहतूकीसाठी घटना परिसरातील रस्ता बंद केला असल्याचे सांगितले.

## रेसिपी
# साबुदाण्याचे धिरडे



**साहित्य:**

साबुदाणा : १ वाटी (सुमारे ६ तास भिजवलेला)
बटाटा (उकडून): १ मध्यम आकाराचा
दाण्याचे कूट: २-३ टेबलस्पून
हिरव्या मिरच्या: १-२ (बारीक चिरलेल्या, चवीप्रमाणे)
जिरे: १ टीस्पून
लिंबाचा रस: १ टीस्पून (ऐच्छिक)
सेंधव मीठ (उपवासाचे मीठ): चवीप्रमाणे
तेल किंवा तूप
कोथिंबीर: बारीक चिरलेली (ऐच्छिक)

**कृती:** साबुदाणा कमीतकमी ६ ते ८ तास पाण्यात भिजवून ठेवा. भिजवलेला साबुदाणा नरम झाल्यावर पाणी काढून टाका. साबुदाणा मऊ आणि चिकट नसावा यासाठी भिजवताना पाण्याचे प्रमाण योग्य ठेवा (साबुदाण्याच्या पृष्ठभागापर्यंत पाणी).मिक्सरमध्ये भिजवलेला साबुदाणा ब्लेंड करुन पेस्ट तयार करुन घ्या. आता त्या उकडलेला बटाटा कुस्करुन, दाण्याचे कूट, बारीक चिरलेल्या हिरव्या मिरच्या, जिरे, सेंधव मीठ आणि कोथिंबीर (ऐच्छिक) मिक्स करा.मिश्रणात आवश्यकतेप्रमाणे थोडे पाणी घालून पीठ तयार करा. खूप पातळ होणार नाही याची काळजी घ्या.लिंबाचा रस घालून मिश्रण नीट एकजीव करा.नॉन-स्टिक तव्यावर थोडे तेल किंवा तूप लावा आणि मध्यम आचेवर गरम करा.तयार केलेल्या मिश्रणाचा एक मोठा चमचा तव्यावर पसरवा. हलक्या हाताने गोलाकार धिरड्याचा आकार द्या.दोन्ही बाजूंनी सोनेरी रंग येईपर्यंत मंद आचेवर शिजवा. प्रत्येक बाजूसाठी २-३ मिनिटे लागू शकतात.धिरडे कुरकुरीत होण्यासाठी तेल किंवा तूप थोडे जास्त वापरू शकता.गरमागरम धिरडे उपवासाच्या दही-दाण्याच्या चटणीसोबत सर्व्ह करा.

# माजी मुख्याध्यापिका कलावती पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : पेण एज्युकेशन सोसायटीच्या माजी मुख्याध्यापिका तथा शाळा व्यवस्थापन समिती शिक्षण तज्ञ कलावती पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आज पेण नगर पालिकेच्या शाळा क्रमांक दोन मधील मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सुनिता म्हात्रे, शिक्षिका योगिता कर्णेकर, सामाजिक कार्यकर्ते संजय पाटील, विजय चव्हाण, संजय खांडेकर, पार्थ शहा, राकेश सांडे, युवा नेते



हितेश पाटील, प्रसाद पाटील, हेमंत गुरव, साईश खांडेकर तसेच परिसरातील महीला मंडळ उपस्थित होते.

माजी मुख्याध्यापिका कलावती पाटील या स्वतः शिक्षण क्षेत्रातील असल्याने शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी कोणत्या गोष्टींची आवश्यकता असते याची त्यांना कल्पना असल्याने गरीबातील गरीब विद्यार्थी ज्या शाळेत शिकतात अशा मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण साहित्य देण्याचा त्यांनी निर्णय घेऊन हा उपक्रम त्यांनी शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि आपल्या परिसरातील नागरिकांना एकत्र करून राबविला. शालेय वह्या, खोडरबर, पेन्सिल बॉक्स आदी साहित्य विद्यार्थ्यांना मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसून येत होता.

यावेळी माजी मुख्याध्यापिका कलावती पाटील यांनी उपस्थित विद्यार्थ्यांनी शुभेच्छा दिल्याबद्दल त्यांचे आभार मानून शालेय जीवनात यशस्वी गगन भरारी घेण्यासाठी त्यांना चांगली स्फूर्ती मिळावी यासाठी ईश्वर चरणी प्रार्थना केली. तर मुख्याध्यापिका सुनिता म्हात्रे यांनी देखील कलावती पाटील यांना शाळेविषयी आणि शाळेच्या मुलांविषयी आस्था निर्माण झालेली असल्याने त्या त्यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी काही ना काही शालेय साहित्य वाटप करतात याबद्दल त्यांचे आभार मानले.



## आजचे राशिभविष्य

**मेष**
जवळच्या सहकाऱ्यांशी मतभेद निर्माण होऊ शकतात. काळजीपूर्वक वागा. समन्वय बिघडू देऊ नका. प्रवासादरम्यान तुम्हाला नवीन मित्र मिळतील.

**वृषभ**
शेतीच्या कामातील अडथळे दूर होतील.तुमचे वरिष्ठ जे काही सांगतात ते नेहमी मान्य करा. आज तुमच्या कामात बदल होऊ शकतो. मनात आनंद वाढेल.

**मिथुन**
तुमच्या कामात सुरू असलेल्या समस्या सुटतील. प्रगती आणि लाभाचे मार्ग खुले होतील. उच्चपदस्थ व्यक्तीकडून मार्गदर्शन मिळेल.

**कर्क**
सरकारमधील लोकांशी तुमची जवळीक वाढेल. तुमच्या कमकुवतपणा सुधारण्याचा प्रयत्न करा. समस्या जास्त वाढू देऊ नका.

**सिंह**
तुमच्या कामाला सकारात्मक दिशा द्या.कार्यक्षेत्रात प्रगती आणि नफा मिळण्याची शक्यता आहे. लांबच्या प्रवासाला जाण्याचे संकेत आहेत.

**कन्या**
नोकरीत पदोन्नती मिळू शकते. सरकारच्या मदतीने शेतीच्या कामात येणारे अडथळे दूर होतील. नियोजनबद्ध पद्धतीने काम केल्याने फायदा होईल.

**तूळ**
सामाजिक कार्यात रस वाढेल. प्रवास करताना अनोळखी लोकांवर जास्त विश्वास ठेवू नका. अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते.

**वृश्चिक**
तुमच्या व्यवसायाची परिस्थिती सुधारेल. नवीन व्यवसायात खूप व्यस्त राहाल. अतिशय महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील.

**धनु**
कोणतेही धोकादायक काम करण्यात तुम्ही यशस्वी व्हाल. दलाशी संबंधित लोकांना महत्त्वाचे यश मिळेल. चळवळीची आणि मोहिमेची कमान मिळेल.

**मकर**
कामाच्या ठिकाणी येणारे अडथळे कमी होतील. उत्पन्नाचे स्रोत वाढतील. कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना फायदेशीर संधी मिळतील.

**कुंभ**
तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. अन्यथा, उगाच वाद होऊ शकतात. वडिलोपार्जित मालमत्तेवरील वाद हाणामारीचे रूप घेऊ शकतो.

**मीन**
तुमच्या शहाणपणाने कौटुंबिक वाद शांत करण्याचा प्रयत्न करा.महत्त्वाच्या कामात काळजीपूर्वक विचार करून निर्णय घ्या.






# कल्याण डोंबिवली महापालिका निवडणूक प्रभाग रचनेत हरकती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : कल्याण डोंबिवली महानगर पालिकेची निवडणूक घेण्या संदर्भात निवडणूक आयोगाच्या परिपत्रकानुसार महापालिकेच्या निवडणूक घेण्या संदर्भात नवीन प्रभाग रचना करण्याची कार्यवाही करण्यात आल्याचे निदर्शनास येत असून सदर प्रभाग रचनेस काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी सचिव संतोष केणे यांनी हरकत घेतली असल्याचे समोर येत आहे.

सदर पत्रात संतोष केणे यांनी कल्याण डोंबिवली महानगर पालिका आयुक्त यांना याविषयी पाठविलेल्या पत्रात अनेक विषय समाविष्ट केले आहेत. त्यामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या 27 गावाच्या निर्णयाचा विषय सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असताना प्रभाग रचना करू नये. 27 गावे महापालिकेतून वागण्या संदर्भात दि. 15/06/2025 रोजी सर्व पक्षीय



हक्क संब्ररक्षण समितीची जाहीर सभा होराईजन हॉल डोंबिवली येथे घेण्यात आली होती. तसेच सदर बैठकीत समितीचे अध्यक्ष खासदार सुरेश ( बाळया मामा) म्हात्रे यांनी जाहीर केले कि 27 गावा संदर्भात मुख्यमंत्री देवेंद् फडणवीस ह्यांच्या दालनात लवकरच बैठक होणार असून सदर विषयावर सकारात्मक निर्णय घेतील अशी आम्हाला आशा आहे.

परिणामी 27 गावा संदर्भात निर्णय होयीपर्यंत नवीन प्रभाग रचना करू नये असे म्हटले आहे.

# प्रभाग रचनेत अनुसूचित जातीच्या प्रभागांची संख्या वाढविण्याची मागणी

## भाजपा अनुसूचित मोर्चा जिल्हा सरचिटणीस राम बनसोडे यांचे केडीएमसी आयुक्तांना पत्र

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण(कुणाल म्हात्रे)** : आगामी कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत अनुसूचित जातीच्या प्रभागाची रचना २०२१ च्या जनगणना व २०२५ च्या लोकसंख्येच्या आधारे ग्राहय धरून अनुसूचित जातीच्या प्रभागांची संख्या वाढविण्याची मागणी भारतीय जनता पार्टी अनुसूचित मोर्चा कल्याण जिल्हा सरचिटणीस राम बनसोडे यांनी केडीएमसी आयुक्तांकडे पत्राद्वारे केली आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या निवडणूकीसाठी प्रभाग रचना करण्याचे काम सुरू आहे. ११ नाव्हेंबर २०२० मध्ये मुदत संपल्याने व २७ गावांचा तिढा कायम असल्याने मा. न्यायालयाच्या आदेशाने महाराष्ट्र शासनाच्या निर्देशाने पहिल्यांदाच पॅनलनुसार प्रभागरचना करण्याचे काम सुरू आहे. महापालिकेची २०११ च्या जनगणनेनुसार १८ लाख लोकसंख्या गृहीत धरून २०१५च्या २७ गावांसह निवडणूका घेण्यात आल्या होत्या. यामध्ये एकूण १२२ प्रभाग होते. त्यामध्ये अनुसूचित जाती प्रभागांची एकुण संख्या १३ होती ती लोकसंख्येच्या व प्रभाग रचनेच्या तुलनेत कमी होती.

पालिका निवडणूका १९९५ पासून कायमच एक प्रभाग निवडणूक झाल्याने लोकप्रतिनिधी व मतदारांना पॅनलपध्दतीने निवडणूकीला सामोरे जाण्याची व महानगरपालिकेला पॅनल प्रभाग रचना पध्दतीने नविनच प्रथमत होत असल्याने पॅनल प्रभाग रचनेचा महापालिका प्रशासनाला अनुभव नाही. मुळात २०११च्या जनगणनेनुसार २०१५-२०२०च्या निवडणूकीत असलेली कमी लोकसंख्या प्रभागाची संख्या कमी झाली व मतदारांची संख्या वाढली त्या तुलनेने १२२ प्रभागांची अनुसूचित प्रभागांची संख्या १३ करण्यात आली जी मुळात लोकसंख्येच्या प्रमाणात कमी व चुकीची आहे.

ओ.बी.सी. आरक्षणाचा निर्णय सुप्रिम कोर्टात प्रलंबित असताना, नव्याने पालिका निवडणूका घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाला दिल्याने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाने होत असलेल्या निवडणूका सामाजिक समांतर आरक्षणाने निवडणूका घ्याव्यात यासाठी पालिका प्रशासनास पॅनल पध्दतीने प्रभागरचना करण्याचे शासनाच्या पॅनलपध्दतीने घेण्यात येणाऱ्या निवडणूका हया झालेल्या २०२१ च्या जनगणना व नव्याने झालेली २०२५ पर्यंतची लोकसंख्या व मतमोजणी नुसार अनुसूचित जातीच प्रभागांची संख्या वाढवण्यात यावी. पूर्वीपासून लोकसंख्येच्या तुलनेत अनुसूचित जातीच्या प्रभागांची संख्या पूर्वीपासून कमी असल्याने हा अनुसूचित जाती प्रवर्गावर सातत्याने अन्याय होत आहे.

तरी महापालिका प्रशासनामार्फत सुरू असलेल्या पॅनल पध्दतीच्या निवडणूक प्रभाग रचनेत अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या आधारे प्रभाग संख्या वाढवावी व अनुसूचित जातीवर होणारा अन्याय दूर करावा अशी मागणी राम बनसोडे यांनी केडीएमसी आयुक्तांकडे केली आहे.

# वरंध घाट ३० सप्टेंबर पर्यंत वाहतुकीसाठी बंद -जिल्हाधिकारी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : राष्ट्रीय महामार्ग क्र. 965, डीडी राजेवाडी ते वरंध (रायगड जिल्हा हद्द) मधील रस्ता हा रस्ता अधिसूचनेच्या दिनांकापासून ते दि.30 सप्टेंबर 2025 या कालावधीमध्ये जड-अवजड वाहनांच्या वाहतुकीकरिता तसेच पावसाळयामध्ये आय.एम.डी.च्या अतिवृष्टीचा इशारा (High Alert) कालावधीत सदर रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतूकीसाठी पूर्णत: बंद करण्याची अधिसूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केली आहे.

सदर कालावधीकरीता रायगड जिल्हा हद्दीमधील वाहतूक सर्व प्रकारच्या वाहतूकीकरीता बंद करण्याबाबत कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग पेण यांनी केलेल्या विनंतीनुसार तसेच पावसाळयामध्ये आय.एम. डी.च्या अतिवृष्टीचा इशारा (High Alert) कालावधीत सदर सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतूकीसाठी बंद करण्याबबात जिल्हाधिकारी यांची खात्री झाली आहे.

त्यानुसार नागरिकांनी पुण्याकडे जाण्यासाठी राजेवाडी फाटा-महाड-माणगांव-निजामपूर-ताम्हिणी घाट-मुळशी-पिरंगुट-पुणे असा मार्ग वापरावा तसेच कोल्हापूरकडे जाण्यासाठी राजेवाडी फाटा-पोलादपूर-खेड-चिपळूण-पाटण-कराड-कोल्हापूर असा मार्ग वापरण्याची शिफारस करण्यात आली आहे.

# भिवंडी महापालिका प्रशासनाची आपत्कालीन कार्यशाळा संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी शहर महानगर पालिका व शिवसेना प्रणित अखिल महाराष्ट्र जनरल कामगार युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने भिवंडी महापालिकेच्या अधिकारी,कर्मचाऱ्यांसाठी आयुक्त अनमोल सागर यांच्या मार्गदर्शनाखाली "आपत्कालीन कार्यशाळेचे" आयोजन करण्यात आले होते. ("Being Safe Training School") पुणे यांच्या माध्यमातून . कार्यशाळा प्रमुख पंकज दर्शले यांनी आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास काय करावे याचे प्रशिक्षण उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिले.शहरातील कोंबडपाडा येथील गाजेंगी सभागृहात ही प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न झाली.

पावसाळा सुरू आहे त्यामुळे अनेक वेळा नैसर्गिक आपत्ती होत असते प्रशासकीय कामकाज करीत असताना एखादे वेळी संकटकालीन परिस्थिती निर्माण झाल्यास




अधिकारी व कर्मचाऱ्यांनी धैर्याने परिस्थिती हाताळावी असे आवाहन पंकज दर्शले यांनी यावेळी मार्गदर्शीय भाषणात व्यक्त केले. कार्यशाळेत उपस्थित कर्मचाऱ्यांना इमारत कोसळणे,झाड पडणे, पाण्यात वीज प्रवाह उतरणे,सर्प दंश, हृद्यविकार (हार्टअँटेक),महिला संरक्षण,आग,पावसाळ्यात पूरजन्य परिस्थिती,भूकंप,दहशतवाद, बॉम्ब सुरक्षा, सायबर सुरक्षा, रस्सीगाठ, बँन्डेजिंग, आणिबाणी,उचलणे,शोध व सुटका इत्यादींची प्रात्यक्षिकेसह प्रशिक्षण (ट्रेनिंग) देण्यात आले.या उपक्रम कार्यक्रमास पालिकेचे विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी, युनियन प्रतिनिधी उपस्थित होते.

# पडघा विभागात मनसेच्या वतीने जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : राजकीय दृष्ट्या महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या भिवंडी तालुक्यातील पडघा विभागात मनसेच्या वतीने जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचा वाढदिवस नुकताच साजरा करण्यात आला त्यानिमित्त लोकसभा जिल्हाध्यक्ष शैलेश बिडवी यांच्या संकल्पनेतून पडघा विभागातील जिल्हा परिषद मराठी शाळा पडघे, वाफाळे, वारली पाडा, कुंभारशिव, देवळी व भोकरी शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यां, शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.विशेष म्हणजे जिल्हाध्यक्ष शैलेश बिडवी यांच्या संकल्पनेतून दरवर्षी मनसे भिवंडी लोकसभा क्षेत्राच्या वतीने पडघा विभागातील विवीध शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येते या वर्षी देखील



विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष डि.के. म्हात्रे, संघटक मदन आण्णा पाटील, जिल्हाध्यक्ष शैलेश बिडवी, तालुकाध्यक्ष विकास जाधव,ग्रामपंचायत पडघा सरपंच रवींद्र विशे, प्रताप विशे, गुरुनाथ मते, गुरुनाथ जाधव,पडघा विभाग अध्यक्ष सदानंद गोरले, ग्रामपंचायत सदस्य नासिर शेख,मयुर गंधे, रुपेश तेलवणे, नरेश शेलार, राकेश पाटील,आदित्य पाटील, कौस्तुभ फापे, अविनाश जाधव, अविनाश दास समवेत शाळेतील शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते, यावेळी शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांच्या वतीने जिल्हाध्यक्ष बिडवी यांच्या संकल्पनेचे कौतुक करून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे आभार मानण्यात आले तसेच विद्यार्थ्यांना पुढे शिक्षणासाठी जी काही मदत, सहकार्य लागेल त्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना १०० टक्के मदत करेल असे जिल्हाध्यक्ष शैलेश बिडवी यांनी आपल्या मनोगत भाषणातून व्यक्त केले. तसेच त्यासोबत हिंदी भाषा सक्तीविरोधात शाळांना पत्र देण्यात आले.

# मुरबाड तालुक्यातील आरोग्य सुविधा सुरळीत करण्याची मनसेची मागणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : मुरबाड तालुक्यातील आरोग्य व्यवस्था अत्यंत दयनीय अवस्थेत सुरू आहे याचा प्रत्यय मुरबाड तालुक्यात अनेक वेळा दिसून आला आहे. काही दिवसापूर्वीच मुरबाड तालुक्यातील आदिवासी बांधवांचा सर्प दंशाने मृत्यू झाला तसेच आता पावसाळ्याचे दिवस सुरू असल्याने मुरबाड तालुक्यातील ग्रामीण भागात व विशेष करून आदिवासी वस्ती वाड्यांमध्ये आरोग्य विषयक समस्या निर्माण होऊ शकतात या अनुषंगाने मुरबाड तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र मधील आरोग्य सेवा सुरळीत सुरू करून तेथे योग्य तो औषध साठा उपलब्ध करून द्यावा यासाठी आज महाराष्ट्र नवनिर्माण मुरबाड शहर शिष्टमंडळाने तालुका आरोग्य अधिकारी श्रीधर बनसोडे यांची भेट घेऊन निवेदन दिले. व आरोग्य व्यवस्था व तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांची औषध साठा तसेच सर्पदंश यावर औषध उपलब्ध करण्यासाठी चर्चा केली. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे मुरबाड शहराध्यक्ष देवेंद्र जाधव, शहरसंघटक कीर्ती गोहिल रुपेश खाटघरे तालुका सचिव , वार्ड क्रमांक १३ अध्यक्ष विकास गुप्ता, करवळे विभाग अध्यक्ष कैलास भावार्थे, सुजित टेकडे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# भिवंडीच्या ट्राफिकमुळे सर्वेश तरेंचं 'मोगऱ्यासारखं गाल' गाणं पुन्हा वायरल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : २०१८ साली युवासाहित्यिक व संगीतकार सर्वेश तरे यांनी लिहिलेलं आणि संगीतबद्ध केलेलं प्रसिद्ध आगरी गाणं 'मोगऱ्यासारखं गाल' पुन्हा एकदा सोशल मीडियावर ट्रेन्डिंगमध्ये आले आहे. तब्बल ३३०० हून अधिक नव्या युजर्सनी यावर रील्स तयार केल्या असून, इन्स्टाग्रामवरील लोकप्रिय कलाकार पायल पाटील, बंटी म्हात्रे यांच्यासह अनेकांनी या गाण्यावर व्हिडीओ बनवले आहेत.

या गीताने २०१८ मध्ये Gana.com च्या मराठी टॉप ५ हिट गाण्यांमध्ये स्थान मिळवले होते. सध्या, तब्बल सात वर्षांनंतर हे गाणं पुन्हा एकदा जनमानसात लोकप्रिय झालं आहे आणि भिवंडीतील ट्राफिक समस्येमुळे ते आणखीनच चर्चेत आलं आहे. भिवंडीतील कशेळी-काल्हेर परिसरात सतत ट्राफिकची समस्या निर्माण होत असून, गाण्यातील प्रसिद्ध ओळ "सांग सांग पोरी... भिवंडीन ट्राफिक कवरी" नागरिकांच्या रोजच्या अनुभवाशी इतकी भिडते की लोक त्या ओळीवर रील्स बनवून आपली खंत व्यक्त करत आहेत.

या अनुषंगाने सर्वेश तरे म्हणतात, "पुन्हा माझं गाणं ट्रेंडमध्ये आल्याचं श्रेय मी भिवंडीचे कामचुकार लोकप्रतिनिधी, निष्क्रिय वाहतूक पोलिस, आणि भिवंडीकर जनतेच्या सहनशीलतेला देतो. त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो," अशी उपहासात्मक प्रतिक्रिया त्यांनी दिली. या गीतास युट्यूबवर आजतागायत १६ लाखांहून अधिक व्ह्यूज मिळाले आहेत. हे गाणं आजही रसिकांच्या मनात आपली जागा टिकवून आहे.

# सरळ प्रवेश व कौशल्य चाचणीव्दारे निवासी व अनिवासी खेळाडूकरीता प्रवेश जिल्हास्तरावर चाचण्यांचे आयोजन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड** : महाराष्ट्रातून जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्यासाठी राज्यातील प्रतिभावान खेळाडूंची निवड करुन त्यांना शास्त्रोक्त प्रशिक्षण, संतुलित आहार व अद्यावत क्रीडा सुविधा पुरविण्याकरीता शिवछत्रपती क्रीडापीठ, बालेवाडी पुणे अंतर्गत राज्यातील कार्यरत असलेल्या 9 क्रीडाप्रबोधिनीत सरळ प्रवेश (50%) व कौशल्य चाचणी (50%) प्रक्रिये अंतर्गत निवासी व अनिवासी प्रवेश देण्यात येणार आहे अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी दिली आहे.

जिल्हास्तरीय प्रवेश चाचण्या ज्युदो, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, शुटींग, फुटबॉल, जलतरण, अॅथलेटिक्स, कुस्ती, बॅडमिंटन,आर्चरी, हॅण्डबॉल, टेबल टेनिस, वेटलिफ्टिंग, ट्रायथलॉन, सायकलिंग, बॉक्सिंग अशा 17 क्रीडा प्रकारात आयोजित केली जात असते. यापैकी ज्या चाचण्यांचे जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर आयोजन केले जाणार आहे, त्या चाचण्यांचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे राहील.

जिल्हास्तर चाचण्या कालावधी दि.24 जून 2025 सकाळी 9.00 वाजता. प्रवेश चाचण्यांचे खेळप्रकार हॅण्डबॉल, जलतरण, ज्युदो, जिम्नॅस्टिक्स, फुटबॉल, सायकलिंग. प्रवेश अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक 23 जून 2025. उपस्थितीचे ठिकाण व वेळ, तालुका क्रीडा संकुल, पनवेल सकाळी 9.00 वाजता. विभागीय चाचण्यांचा अंदाजित कालावधी दि.26 ते 27 जून 2025. राज्यस्तर चाचण्यांचा अंदाजित कालावधी व ठिकाण दि. 05 ते 8 जुलै 2025 ठिकाण-शिवछत्रपती, क्रीडापीठ बालेवाडी व नागपूर क्रीडा प्रबोधिनी. वयोमर्यादा- 07 जुलै 2006 नंतर जन्मलेले व 08 जुलै 2025 रोजी पर्यंत 19 वर्षे पुर्ण झालेले खेळाडू.

# कल्याण मोहम्मद अली चौक रस्त्याला वाहतूक कोंडीचे ग्रहण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पश्चिमेतील मोहम्मद अली चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक रस्त्याला वाहतूक कोंडीचे ग्रहण लागले असून अँब्युलन्स देखील या वाहतूक कोडींत अडकत असल्याने रुग्णाला वेळेत रूग्णालयात उपचारासाठी नेता आले नाही आणि संभाव्य जिवितहानी हानी झाली तर त्यास जबाबदार कोण असा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

कल्याण पश्चिमेतील मोहम्मद अली चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक रस्ता हा बाजार पेठ रस्ता असून स्टेशन पासून जवळ असणाऱ्या या रस्त्यावरून कल्याण डोंबिवली महानगरपालिका मुख्यालयात पोचण्यासाठी करदात्या नागरिकांपासून प्रवाशांना देखील द्रविडी प्रणायाम करीत फुटपाथवरून चालतांना कसरत करावी लागत आहे. याला कारण रस्त्यावरील वाहतूक कोंडी, बेशिस्तपणे पार्क केलेली दुचाकी, चार चाकी गाड्या, फुटपाथ लगत अनाधिकृत ठेलेवाले, अनाधिकृत हातगाड्या, अनाधिकृत फेरीवाल्यांचा विळखा आहे. तर बेशिस्त वाहन चालकांची रस्त्यावर वाहन चालविताना लेनची शिस्त न पाळता होणारी घुसखोरी आणि त्यातून होणारी वाहतूक कोंडी याला चाप कोण लावणार असा सवाल यानिमित्ताने उभा ठाकला.

याच रस्त्यापासून हाकेच्या अंतरावर असणारे वाहतूक शाखा कार्यालय, केडीएमसी मुख्यालय या प्रशासाकिय यंत्रणाना देखील यावर आवार घालता येत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. शुक्रवारी दुपारी सव्वा दोनच्या सुमारास मोहम्मद अली चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक रस्त्या दरम्यान दोन अँब्युलन्सला रस्त्यावर झालेल्या वाहतूक कोंडीचा फटका बसल्याने सायरनचा आवाज ऐकू येत असून देखील दहा मिनिटे त्यांना जाण्यास वाहतूक कोंडी मुळे वाव मिळाला नाही. त्या अँब्युलन्स मध्ये उपचारार्थ रूग्णालयात नेणार्या रूग्णाचे गोल्डन अवरला या वाहतूक कोंडीचा फटका बसल्याने संभाव्य रूग्णाची जिवितहानी झाली तर हे दुर्दैवच म्हणावे लागेल?

चार दिवसापूर्वी सहाय्यक आयुक्त "क" प्रभाग धनंजय थोरात यांच्या फेरीवाला पथकाबरोबर झालेल्या फेरीवाल्याच्या वाद प्रकरणी गुन्हा दाखल केला तरी समस्या कायम असल्याचे दिसते. या रस्त्यावरील नेहमीच होणाऱ्या वाहतूक कोंडीचे ग्रहण प्रशासकीय यंत्रणा कसे सोडविणार असा सवाल यानिमित्ताने होत आहे. संदर्भीत रस्त्यावरील सुरळीत वाहतूक आणि पादचाऱ्यांना चालण्यासाठी फुटपाथ कधी मोकळे होणार अशी मागणी यानिमित्ताने जोर धरू पाहत आहे.

"केडीएमसी क प्रभाग क्षेत्र सहाय्यक आयुक्त धनंजय थोरात यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, फेरीवाला हटाव मोहीम सुरूच असून या रस्त्यालगत दुचाकी पार्किंग संदर्भात वाहतूक विभाग यांच्या बैठकी दरम्यान रस्त्यालगत रस्त्याच्या एका बाजूस दिवसाआड पार्किंग करण्याचे नियोजन असून बाजारपेठ मधील दुकानदारांच्या दुचाकी पार्किंगसाठी स्टेशन परिसरात असलेल्या मनपा वाहनतळ येथे पार्किंग व्यवस्था सवलती दरात उपलब्ध होणार असल्याने दुकानदारांनी याचा लाभ घ्यावा. पार्किंग मुक्त रस्ता राहण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे असे त्यांनी सांगितले.






# शिवसह्याद्री प्रतिष्ठान वतीने विद्यार्थ्यांचा गुणगौरव



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : शिव सह्याद्री प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य कल्याण विभाग या माध्यमातून सामाजिक बांधिलकीचा वसा जोपासला जात असून, पिसवली येथे विद्यार्थ्यांना वह्या वाटप व विद्यार्थी गुणगौरव समारंभ नुकताच पार पडला. समाजातील आर्थिक, दुर्बल, गरीब व गरजू अशा अनेक विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत, संस्थापक अध्यक्ष सतीश पेडणेकर, अनिल कोकाटे, शरद बिरामणी, मोहन फराकटे, सतबा दाभोळे, दत्ता पाटील, संजय बाळनाईक आणि शिव सह्याद्री प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये गुण गौरव सोहळा पार पडला. यावेळी गरजू 100 विद्यार्थ्यांना वह्या व शालेय उपयोगी साहित्यांचे वाटप करण्यात आले. तसेच १० वी, १२ वी मधील विद्यार्थी व क्रीडा क्षेत्रामध्ये व सामाजिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या नामवंत विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

# चेन्नई पॅटर्न उपक्रमात २७ गावातील तरुणांना नोकरीची संधी द्या

## २७ गाव सर्वपक्षीय संघर्ष समितीचे उपाध्यक्ष गुलाब वझे यांची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : चेन्नई महापालिका अंतर्गत असणारी शहरे 'कचरामुक्त शहर' उपक्रम राबविण्यात अग्रेसर आहे. त्याच धर्तीवर केडीएमसी मध्ये चेन्नई पॅटर्न राबविले जाणार आहे. अशा उपक्रमातून २७ गावातील तरुणांना नोकरीची संधी द्यावी अशी मागणी २७ गाव सर्वपक्षीय संघर्ष समितीचे उपाध्यक्ष गुलाब वझे यांनी पालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्याकडे केली. २७ गावातील भूमिपुत्रांनी आपल्या स्वतःच्या जमिनी विविध विकासकामांसाठी सरकारला दिल्या. परिणामी ठाणे, रायगड, पालघर आदी जिल्ह्यात विकास प्रकल्प उभे राहिले मात्र येथील भूमिपुत्रांकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे विकास प्रकल्प तसेच पालिका उपक्रमात २७ गावातील भूमिपुत्र तरुणांना प्रथम संधी द्यावी अशी मागणी वझे यांनी केली आहे. संत सावळाराम महाराज स्मारकाकरता जागेची पाहणी आयुक्तांनी करावी, त्या 499 कर्मचाऱ्यांना नियुक्ति पत्र द्यावे, 27 गावातील अंतर्गत रस्ते व भूमिगत गटारांच्या कामाकरता राज्यशासनाकडून निधी मंजूर करावा, 27 गावातील स्मशानभूमी दुरुस्तीकरता 50 लाखाची तरतूद करावी, 27 गावातील मराठी शाळा ( पालिकेच्या ) व आरोग्य केंद्रबाबत नगरविकास मंत्र्यांकडे उच्चस्तरीय बैठक घ्यावी आदी मागण्यावर संघर्ष समिती ठाम आहे असेही वझे यांनी सांगितले.

# निराधार बालकांना मिळणार आधार ▌ जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचा पुढाकार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / रायगड: समाजामध्ये असंख्य अशी निराधार बालके आहेत. अशा बालकांना कागदोपत्री कोणतीही तरतुद नसल्यामुळे शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे. असे उपलब्ध माहितीतून दिसून आले आहे. त्याचाच गांभिर्याने विचार करून निराधार बालकांना नैसर्गिक त्यांचे अधिकार देण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली, राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशनानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड यांच्या तर्फे निराधार व भटक्या जमातीच्या बालकांच्या हक्कांना आधार देण्याकरिता "साथी समिती गठित करण्यात आली आहे. साथी समितीचा मुळ उद्देश निराधार बालकांच्या हक्कांना आधार देणे म्हणजेच समाजामध्ये जी निराधार बालके आहेत, ज्या बालकांना कोणताही आधार नाही, कागदोपत्री देखील कोणता पुरावा नाही, अशा बालकांना साथी समितीतर्फे २७ जून ते ५ ऑगस्ट या कालावधी मध्ये मोहिम राबविली जाणार आहे. सदरील समिती निराधार बालकांचा सर्व्हे करून त्या बालकांना आवश्यक व महत्त्वाचे असणारे आधारकार्ड काढून देणार आहे. त्यामुळे बालकांना त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी तसेच त्यांच्या अन्य वैयक्तिक ओळखीकरीता मोलाची मदत होणार आहे. या समितीमध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. राजेंद्र सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली व विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव व साथी समितीच्या अध्यक्षा श्रीमती तेजस्विनी निराळे यांच्या नेतृत्वा खाली ही विशेष मोहिम राबविली जाणार आहे. समितीमध्ये विधी सेवायंत्रणा, स्थानिक प्रशासन सर्व तालुक्यांचे तहसीलदार, पोलीस, आरोग्य, शिक्षण विभाग, सामाजिक संस्था बालकल्याण समिती विधीज्ञ, विधी स्वयंसेवक तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी, महिला व बालविकास अधिकारी, पोलीस अधिकारी संबंधित सर्व NGO शासकिय व अशासकीय संस्थांच्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला असून सर्व शासकिय स्थरावर एकत्रित बालकांसाठी काम करून निराधार बालकांना न्याय देण्याचे कार्य राबविले जाणार आहे.याकरिता आपल्याला माहित असलेल्या निराधार बालकांची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड-अलिबाग या कार्यालयाकडे पाठविण्यात यावी व योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव व साथी समितीच्या अध्यक्षा श्रीमती तेजस्विनी निराळे यांनी केले आहे.

# ‘धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान’ जिल्ह्यातील आदिवासी बांधवांनी अभियानाचा लाभ घ्यावा

## - जिल्हाधिकारी किशन जावळे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड :** “धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान हा केंद्र शासनाचा महत्वाकांक्षी उपक्रम असून जिल्ह्यातील आदिवासी बांधवांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आज येथे केले. अलिबाग येथील भाग्यलक्ष्मी हॉल येथे आयोजित “धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान शुभारंभ कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, प्रांताधिकारी मुकेश चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी श्री.सुर्यवंशी, प्रकल्प संचालक श्रीमती प्रियदर्शिनी मोरे, पेण एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, आत्माराम धाबे, तहसिलदार विक्रम पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी श्री.जावळे म्हणाले की, धरती आबा जनजाती ग्रामउत्कर्ष अभियान या केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी उपक्रमाचा शुभारंभ भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 02 ऑक्टोबर 2024 रोजी झाला असून या उपक्रमाचा कालावधी पाच वर्षांचा असला तरी एक वर्षातच आदिवासी बांधवांपर्यंत सर्व योजनांचा लाभ पोहोचवण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला आहे. देशातील आदिवासी बांधवांच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात “धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान (DA-JGUA)” संपूर्ण देशभर राबविण्यात येत आहे. याच धर्तीवर रायगड जिल्ह्यातील 14 तालुक्यांतील 113 आदिवासी गावांमध्ये या अभियानाची अंमलबजावणी होणार आहे. उर्वरित गावे देखील स्थानिक पातळीवर यादीत सामील केली जाणार आहेत.भगवान बिरसा मुंडा यांच्या 150 व्या जयंती वर्षाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी कार्यालय रायगड आणि प्रकल्प कार्यालय आदिवासी विभाग अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने धरती आबा जनभागीदारी अभियान कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले.जिल्ह्यात संवाद सेतू नावाचा उपक्रम सुरू करण्यात आला असून आठवड्यातून दोन दिवस ग्रामपंचायतीमध्ये आदिवासी बांधवांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या जातात. दर आठवड्याला अधिकारी किमान दोन आदिवासी वाड्यांना भेटी देतील, असा मानस देखील जिल्हाधिकारी यांनी व्यक्त केला. "गाव तिथे रोजगार" ही संकल्पना राबवून आदिवासी बांधवांचे स्थलांतर रोखण्याचा प्रयत्न केला जाणार असून आदिवासी वाड्यांमध्ये जाणारे रस्ते, आरोग्य तपासणी शिबिरे, आणि इतर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पीएमजनमन व धरती आबा अभियानांतर्गत विविध कामे हाती घेण्यात येणार आहेत. तसेच पावसाळ्यात संपर्क तुटणाऱ्या वाड्यांमध्ये आजारी व्यक्तींना तातडीची मदत मिळण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. धरती आभा अभियानांतर्गत 17 विभाग सहभागी असून 25 प्रकारची कामे करण्यात येणार आहेत.कार्यक्रमाचे उद्घाटन झाल्यानंतर विविध ठिकाणी कॅम्प घेण्यात येत असून, अधिकारीही या कॅम्पना भेटी देणार आहेत. हे अभियान केवळ शासकीय योजनेपुरते मर्यादित न राहता जिल्हा प्रशासनाचा प्रभावी सहभाग आणि नवकल्पनांमुळे अधिक प्रभावीपणे राबवले जाणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.कार्यक्रमांमध्ये शासनाच्या विविध योजनांचे स्टॉल लावण्यात आले होते. धरती आबा जनभागीदारी अभियान 15 ते 30 जून 2025 या कालावधीमध्ये राबविण्यात येणार आहे. या कार्यक्रमांमध्ये तहसिल कार्यालय अलिबाग यांच्यामार्फत विविध स्टॉल मतदार नोंदणी, पुरवठा विभाग, संजय गांधी विभाग आणि सेतू विभाग यांचा समावेश होता. या कार्यक्रमांमध्ये 43 नवीन मतदारांची नोंदणी करण्यात आली. ज्या मतदारांच्या नोंदीमध्ये दुरुस्ती होती अशा मतदारांचे नमुना आठ चे 15 अर्ज याप्रसंगी भरून घेण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते आदिवासी लाभार्थ्यांना अंत्योदय योजनेंतर्गत लाभार्थ्यांना शिधापत्रिकेचे वाटप, उत्पन्न वय आदिवास नॉन क्रिमीलेअर आणि जातीच्या दाखल्याचे वाटप तसेच कृषी विभागामार्फत कृषी बी बियाणे, आभा कार्डचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी आत्माराम धाबे यांनी केले. कार्यक्रमापूर्वी आदिवासी बांधवांनी आपले आदिवासी नृत्य सादर केले. कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाला विविध शासकीय विभागाचे अधिकारी, कर्मचारी, पत्रकार तसेच आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# योगसाधना हीच निरोगी जीवनाची गुरुकिल्ली

**लेखक**
**रणवीर राजपूत**
**निवृत्त जिल्हा माहिती अधिकारी**

योगविद्या ही भारताने जगाला दिलेली मोठी देणगी आहे. भारतीय योगसाधनेला सुमारे पाच हजार वर्षांची वैभवशाली परंपरा आहे. योग हा प्राचीन भारताचा अनमोल ठेवा आहे. शरीर व मन यांच्यातील आंतरिक नात्याला योगाभ्यासात अनन्यसाधारण महत्व आहे. मानवी जीवनात मानसिक संतुलन, समग्रता, आत्मशांती, शारीरिक स्वास्थ्य लाभणे, ही योगाभ्यासाची मुख्य उद्दिष्टे आहेत. योग हा मूळ संस्कृत शब्द असून, त्याचा अर्थ जोडणे वा जुळविणे असा होतो. योग विद्येतून शरीर व मन या दोन घटकांना एका धाग्यात ओवून त्यांच्यात मेळ घातला जातो. थोडक्यात योग मार्गाचा अवलंब केल्याने निरोगी आरोग्य लाभून निरामय जीवनाची दृष्टी लाभते, हे त्रिकाल सत्य आहे.

सध्याच्या धावत्या जगात माणसात ताणतणाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. तसेच आधुनिक विज्ञान व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात मानवाच्या जीवनशैलीत (लाईफस्टाईल) आमूलाग्र बदल होताहेत. त्यामुळे काही प्रमाणात युवकांमध्ये चंगळवाद वाढीस लागला आहे. जेवणाच्या ताटात चौरस आहाराची जागा आता पिझ्झा, बर्गर, चायनीज फूडने घेतली असल्याचे सर्वत्र आढळते. त्यात स्पर्धात्मक युगाची भर पडली आहे. परिणामी युवकांच्या स्वास्थ्यावर याचे विपरित परिणाम होत असल्याचे प्रकर्षाने दिसते. अशा ताणतणावाच्या कारणांमुळे भारत ही आता जगाची मधुमेहाची राजधानी झाली आहे. आजच्या युवा पिढीच्या आहारामधील जंक फूडचे वाढते प्रमाण बघता, मधुमेहसह रक्तदाब, लठ्ठपणा, ॲसिडीटी हे विकार जडत चालले आहेत. हे सर्व घालविण्यासाठी योग साधना करणं काळाची गरज बनली आहे.

स्पर्धेच्या युगात युवा वर्गात नोकरी, व्यवसायसंदर्भात मोठा ताणतणाव असतो. या पार्श्वभूमीवर मानवी जीवनातून ताणतणावाच्या गोष्टी कायमच्या हटविण्यासाठी योगसाधनेची कास धरणे आवश्यक आहे. कारण त्यातून मन स्थिर तर, शरीर चपळ व सुदृढ होण्यास बळ मिळते.

भारत हा साऱ्या जगात युवकांचा देश म्हणून ओळखला जातो. केवळ भारताच्या युवा पिढीचेच नव्हे तर अन्य वयोगटातील व्यक्तींचे मानसिक व शारीरिक स्वास्थ्य निरोगी व सुदृढ रहावे, या प्रांजळ उद्देशाने, पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांनी दि.27 सप्टेंबर 2014 रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत योगाभ्यासाचा प्रस्ताव मांडत त्याचे महत्त्व अन् उपयुक्तता विशद केली. योगाभ्यासामुळे मानवाच्या जीवनात लक्षणीय परिणाम होऊन त्यात आमूलाग्र परिवर्तन होते, हे जगाच्या प्रतिनिधींना त्यांनी पटवून दिले. त्याची परिणीती म्हणजे त्यांच्या प्रस्तावास व्यापक प्रमाणात प्रतिसाद मिळून सुमारे 170 देशांनी त्यास मान्यता दिली. अंतत: 21 जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यास संयुक्त राष्ट्र संघाने मंजुरी दिली. ही गोष्ट भारताच्या दृष्टीने मोठ्या सन्मानाची आहे. यासाठी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचे आभार मानणे क्रमप्राप्तच ठरते.



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी जनतेला आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. चला तर, योगाभ्यासाचा अंगिकार करूया अन् आपले मन व शरीर सुदृढ व निरोगी बनवूया!




# वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांचा ठाणे जिल्हा दौरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे हे दि.22 जून 2025 रोजी ठाणे जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे आहे.

दि.22 जून 2025 रोजी सकाळी 05.15 वाजता कल्याण रेल्वे स्टेशन येथे आगमन व शासकीय वाहनाने शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण. सकाळी 06.10 वाजता शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव. सकाळी 09.30 वाजता शासकीय विश्रामगृह येथून स्वामी नारायण हॉल, कल्याणकडे सामाजिक कार्यक्रमाकरिता रवाना. सकाळी 10 वाजता स्वामी नारायण, महानगरपालिकेसमोर, कल्याण येथील सामाजिक कार्यक्रमास उपस्थिती (संदर्भ- श्री.अनिल काकडे - 9424552963). सकाळी 10.30 वाजता कल्याण येथून ओमसाई बँक्वेट हॉल, उल्हासनगरकडे सामाजिक कार्यक्रमाकरिता रवाना. सकाळी 11 वाजता ओम साई बँक्वेट हॉल, ग्रीनलीफ हॉटेल जवळ, उल्हासनगर येथील कार्यक्रमास उपस्थिती. (संदर्भ- श्री.प्रल्हाद काकडे - 9881719892). सकाळी 11.30 वाजता ओम साई बँक्वेट हॉल, उल्हासनगर येथून घाटकोपरकडे रवाना.

# मुरबाड तालुक्यात मण्यार सापाचा वावर वाढला

## आरोग्य विभागाचे खबर घेण्याचे नागरिकांना आवाहन!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड(बाळासाहेब भालेराव) :** ठाणे जिल्ह्यातील विशेषतः मुरबाड तालुक्यातील ग्रामीण भागात तसेच आदिवासी पट्ट्यात व मुरबाड शहर परिसरात पावसाळा सुरू झाला की अनेक ठिकाणी रात्रीच्या वेळेस निशाचर प्राण्यांचा वावर वाढतो अशातच सर्वात विषारी मानला जाणारा सर्प म्हणजे मन्यार जातीचा आहे पावसाळ्यामध्ये पाणी शिरून सर्प बसण्याची जागा पाण्याने भरल्याने सर्प हे मानवी वस्तीमध्ये म्हणजेच घरामध्ये अथवा ज्या ठिकाणी त्यांना राहण्यासाठी सुरक्षित जागा मिळेल अशा ठिकाणी असे विषारी सर्प आपला निवारा शोधतात अशाच प्रकारे मुरबाड तालुक्यात अनेक ठिकाणी मन्यार सर्पदंशाने लोक दगावले आहेत.. म्हणून सावधान,,, सावधान,,,

मन्यार सर्प हा काही ठिकाणी कंडोर ,कांडोरा, मण्यार असे बोलले जाते मुरबाड तालुक्यामध्ये अनेक ठिकाणी मण्यार जातीचा सर्प मोठ्या प्रमाणात आढळतो या सर्पाचे वैशिष्ट्य म्हणजे या सर्पाचे डोके लहान असून तोंड चपटे असते व हा काळसर रंगाचा असून त्याच्या अंगावरती सफेद रंगाच्या पट्टे असतात हा सर्प निशाचर मधला खरोखरच असल्याचा पुरावा म्हणजे हा रात्रीचा शिकारीवर निघत असतो त्याचे शिकार म्हणजे छोटे बेडूक ,उंदीर ,किडे ,पाली, सरडे असे असते यामुळे तो लोक वस्तीमध्ये लोकांच्या घरांमध्ये जास्त प्रमाणात आढळतो हा रात्रीच्या वेळेस त्याचे भक्ष शोधत असताना उष्णतेचे ठिकाण म्हणून अनेकांच्या अंथरुणात घुसून बसतो माणसाची हालचाल झाल्यास त्याच्या नरम अथवा चपट्या भागाला तो दंश करत असतो त्याचे कारण त्याचे तोंड चपटे व लहान असते त्यामुळे तो कानाची बाळी बोटांच्या फटीमध्ये पायांच्या बोटांच्या फटीमध्ये वा टाचेच्या वरच्या भागाला जास्त प्रमाणात चावण्याच्या खुणा आढळतात हा मन्यार सर्प चावताना त्याचा दंश समजून येत नाही त्यामुळे त्याचे विष काही काळानंतर झोपेतच माणसाच्या शरीरात पसरते व मेंदूला मज्जातंतूला बाधित करते व श्वसन घेण्यास त्रास झाल्याने माणसाचे शरीर मृत करतो हा मन्यार सर्प नाग-कोब्रा अशा जातींच्या सर्पां पेक्षा याच्या विषयाचे ताकद प्रमाण अधिक व जहाल असते मन्यार सर्प लहान असो वा मोठा याचे विषाचे प्रमाण १००% घातक असते मन्यार सर्पाचे दात अतिशय बारीक व तीष्ण असल्याने तो दंश करताना समजून येत नाही व दंश झालेली जागा देखील लवकर समजून येत नाही व मनुष्य झोपेत असताना अशा प्रकारे मन्यार सर्प हा जास्त प्रमाणात दंश करतो मन्यार सर्पाच्या राहण्याची जागा ह्या अडगळीच्या ठिकाणी दरवाज्याच्या फटीत,खिडकीच्या फटीत, विटांच्या फटीमध्ये व बारीकशा बारीक जागेमध्ये मण्यार सर्प राहू शकतो व तो दिवसा जास्त दिसून येत नसून निशाचर असल्याने हा रात्रीच बाहेर पडतो.. मन्यार सर्प फक्त घरातील एका मनुष्याला चावून थांबत नाही तर आजूबाजूच्या देखील मनुष्यांना चाऊ शकतो एवढा हा घातक व विषारी रागीट सर्प आहे त्यामुळे याच्यापासून लांब राहणे व सावधान राहणे हेच योग्य आहे जर आपल्याला कोणाला चावला असे समजले असेल तर ताबडतोब आरोग्य विभागाशी व दवाखान्यात जाऊन संपर्क साधावा त्याचा इलाज हा दवाखान्यातच होईल तसेच जर समजून आल्यास दंश झालेल्या जागेच्या वरच्या बाजूस कापडी दोरीने घट्ट आवळून बांधावे तसेच कोणताही सर्प चावल्यास आपण जवळच्या दवाखान्यात दाखल व्हावे असे . टोकावडे प्राथमिक आरोग्य केंद्राचे अधिक्षक वैद्यकीय अधिकारी नितीन मोकाशी यांनी केले आहे.



**मी आतापर्यंत मुरबाड तालुक्या सह इतर ठिकाणी अनेक विषारी,बिनविषारी सर्प पकडून त्यांना वन विभागाच्या जंगलामध्ये सोडलेले आहे मन्यार सर्प हा खरोखरच सर्वात जास्त विषारी व चप्पळ तसेच घातक आहे याचा चावा सहज समजून येत नाही याच्यापासून हवे तेवढा आपला बचाव करणे हेच योग्य आहे.**
**- अनिल सकट,सर्पमित्र ,मुरबाड**




# क्रू मेंबर रोशनी राजेंद्र सोनघरे हिच्या पार्थिवावर अत्यंसंस्कार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** अहमदाबाद येथील विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झालेल्या डोंबिवलीच्या २७ वर्षीय क्रू मेंबर रोशनी राजेंद्र सोनघरे हिच्या पार्थिवावर आज गुरुवारी सकाळच्या सुमारास पूर्वेकडील शिवमंदिर येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आला. नातेवाईक, मित्रमंडळी आणि शहरातील विविध क्षेत्रातील नागरिकांनी श्रद्धांजली वाहिली.

मागील आठवड्यात अहमदाबादहून लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाच्या बोईंग विमानात हवाई सेविका म्हणून रोशनी कार्यरत होत्या. उड्डाणाच्या तयारीदरम्यान विमानाच्या अघटित अपघातात रोशनी यांचा मृत्यू झाला. विमानात भीषण आग लागल्याने मृतदेह पूर्णतः जळून गेला होता. मृतदेह ओळखण्यासाठी डीएनए चाचणी करण्यात आली. वडील राजेंद्र आणि भाऊ विघ्नेश सोनघरे अहमदाबाद येथे गेले होते. डीएनए चाचणी यशस्वी झाल्यानंतर बुधवारी रोशनी यांचा मृतदेह कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आला. बुधवारी मध्यरात्री मुंबई विमानतळावर पोहोचलेल्या पार्थिवावर गुरुवारी सकाळी डोंबिवलीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

स्वर्गारोहण रथातून आणलेल्या रोशनी हिच्या पार्थिवावर वडील राजेंद्र यांनी अत्यंविधी केला. अंत्ययात्रेत शेकडो नागरिक सहभागी झाले होते. पूर्वेकडील राजाजी पथ परिसरात रोशनी आपल्या आई-वडील आणि भावासोबत राहत होती. अत्यंत मनमिळाऊ स्वभावाची, हसतमुख रोशनी ही सोशल मीडियावरही सक्रिय होती. तिच्या इन्स्टाग्रामवर ५४ हजारांहून अधिक अनुयायी होते. पूर्वी ती स्पाईस जेटमध्ये होती आणि गेली दोन वर्षे एअर इंडियामध्ये कार्यरत होती.

# वृक्षदिंडी, वृक्षारोपण व निबंध, काव्य स्पर्धांचे बक्षीस वितरण समारंभ संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील) :** पर्यावरण मित्र बहुउद्देशीय सामाजिक संस्था भारत व पद्मश्री भाऊसाहेब वर्तक महाविद्यालय विरार यांच्या वतीने वृक्षदिंडी, वृक्षारोपण या कार्यक्रम आयोजन करुन पूर्वी पार पडलेल्या निबंध व काव्य स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा संपन्न झाला.

पर्यावरण मित्र बहुउद्देशीय सामाजिक संस्था भारत व पद्मश्री भाऊसाहेब वर्तक महाविद्यालय विरार पूर्व यांच्या संयुक्त विद्यमाने 5 जून पर्यावरण दिनानिमित्ताने आयोजित केलेल्या निबंध स्पर्धा व काव्य स्पर्धा यांचा पारितोषिक वितरण सोहळा पद्मश्री भाऊसाहेब वर्तक महाविद्यालय विरार पूर्व येथे संपन्न झाला तर या कार्यक्रमावेळी वृक्षदिंडी व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजनही करण्यात आले होते.

या कार्यक्रम प्रसंगी संस्थेच्या संचालिका रजनी बगे,महाविद्यालय प्राध्यापिका डॉ. शुभम पाटील, पर्यावरण संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष विजय चोघळा, राष्ट्रीय सचिव संगीताताई भेरे, राष्ट्रीय कोषाध्यक्ष प्रदीप चव्हाण, राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य व ठाणे जिल्हाध्यक्ष प्रशांत जाधव, महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष दिनेश चौधरी, वर्तक महाविद्यालय प्राचार्या शितल कोरडकर, मयूर संकेश्वर , किरण बनसोडे व पर्यावरण संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालय प्राध्यापक-प्राध्यापिका, कर्मचारी वर्ग व विद्यार्थी आदीजण उपस्थित होते.



सदर, कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलाने करून त्यानंतर संस्थेतील शंभर विद्यार्थी यांच्या मनमोहक तालासुरात लेझीमच्या साथीने वृक्षदिंडी काढण्यात आली व वृक्षारोपण करण्यात आले. तर घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय निबंध व काव्य या स्पर्धां मधील विविध गटातील एक ते तीन क्रमांक उत्तीर्ण विद्यार्थ्यांना स्पर्धेची बक्षीसे देण्यात आली. तर हेमांगी सावंत यांना आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्राध्यापिका डॉ. शुभम पाटील यांनी आपले विचार मांडून सर्वांना शुभेच्छा दिल्या. तसेच पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन आणि पर्यावरण संस्थेचं प्रचार आणि प्रसार करण्यासाठी सदरच्या स्पर्धांचा आयोजन करण्यात आले असल्याचे पर्यावरण संस्थेचे राष्ट्रीय कोषाध्यक्ष प्रदीप चव्हाण यांनी म्हटले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक चौघडा यांनी प्रतीक्षा बोरुडे यांनी संस्थेचे कार्य व कार्यक्रमा संदर्भात माहिती सांगितली तर शिक्षक अर्जुन बॉम्बे व गोतारणे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक निखिल नाईक यांनी तर आभार शितल वर्तक यांनी मानले.

# आरोपी विशाल गवळीची पत्नी साक्षी गवळीला जामीन मंजूर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील एका अल्पवयीन बालिकेच्या हत्या प्रकरणात सहभागी असल्याचा आरोप असलेल्या मयत आरोपी विशाल गवळीची पत्नी साक्षी गवळी हिला गुरूवारी कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयातील पोक्सो न्यायालयाचे विशेष न्यायाधीश व्ही. ए. पत्रावाले यांनी जामीन मंजूर केला. गुन्हा घडल्यानंतर मागील सात महिन्यांपासून ती तुरूंगात होती. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये कल्याण पूर्वेत चक्कीनाका भागात विशाल गवळी याने एका अल्पवयीन बालिकेला आपल्या घरात नेले. तिच्यावर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केली होती. या हत्येप्रकरणी पोलिसांनी त्याला अटक केली होती. या अटकेनंतर पोलिसांनी त्याची पत्नी साक्षीला अटक केली होती. या हत्या प्रकरणात, मृतदेहाची विल्हेवाट लावण्यात साक्षीचाही सहभाग असल्याचा आरोप बालिकेच्या कुटुंबीयांनी केला होता.

हे प्रकरण विशेष जलदगती न्यायालयासमोर चालवून आरोपींना फाशीची शिक्षा होईल अशी जोरदार मागणी नागरिक, पीडित बालिकेच्या कुटुंबीयांकडून करण्यात येत होती. या प्रकरणात सरकारने सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. उज्वल निकम यांची नियुक्ती केली होती. हा खटला कल्याण जिल्हा न्यायालयातील विशेष बाल लैंगिक अत्याचार न्यायालयात चालविला जात होता. या खटल्याच्या सुनावण्या सुरू होत्या. मात्र आरोपी विशाल गवळीने दोन महिन्यापूर्वी तळोजा तुरूंगात गळफास घेऊन आत्महत्या केली.

साक्षीच्यावतीने न्यायालयात जामिनासाठी अर्ज करण्यात आला होता. या गुन्ह्यात बालिकेचे अपहरण, तिचा खून साक्षीचा पती विशालने केला होता, असे न्यायालयाला साक्षीच्या वकिलांकडून सांगण्यास आले. साक्षीने पतीला मृतदेह लपविण्यासाठी आणि विल्हेवाट लावण्यासाठी साहाय्य केले, असा तिच्यावर आरोप आहे. गुन्हा घडला त्यावेळी आपण बँकेत कामावर होते. घरी येण्यापूर्वीच गुन्हा घडून गेला होता. या प्रकरणात विशालने आपणास धमकावून मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी आपणास साहाय्य करण्यास सांगितले, असे साक्षीच्यावतीने न्यायालयात सांगण्यात आले. याप्रकरणाचा तपास पूर्ण झाला असून आरोपपत्र न्यायालयात दाखल आहे. साक्षी तपास काम आणि खटल्याच्या कामात सहकार्य करत आहे. त्यामुळे सरकारी वकील आणि तपास यंत्रणांनी तिच्या जामिनाला हरकत नसल्याचे न्यायालयाला सांगितले. साक्षी गवळी हिची भूमिका पुरावे लपविण्यापुरती होती, असे मत न्यायालयाने नोंदविले. भारतीय न्याय संहितेच्या कलम २३८(अ) अंतर्गत हा गुन्हा जामीनपात्र असल्याने न्यायालयाने तिला दहा हजार रूपयांच्या वैयक्तिक हमीवर जामीन मंजूर केला. विशालचे गुन्हेगारी पार्श्वभूमीचे तीन भाऊ काही महिन्यापूर्वीच पोलिसांनी ठाणे,मुंबई, रायगड जिल्ह्यातून तडीपार केले आहेत.तर सरकारने जेव्हा उज्वल निकम, यांची नियुक्ती केली तेव्हा कल्याण पूर्व येथील सर्वजण राजकीय क्षेत्रातील काही लोकांनी देखील या नियुक्तीला विरोध केला होता. उज्वल निकम यांनी विश्वासघात केला, मात्र आमच्या पदरात काय पडलं, माझ्या मुलीला न्याय मिळाला नाही, असे पीडितेच्या वडिलांनी आरोप केला आहे. तर उज्वल निकम यांच्यावर आता लोकांनीच प्रश्नचिन्ह उपस्थित केला असल्याचे पीडीतेचे वकील नीरज कुमार यांनी सांगितले.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं. २०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024